# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# पाटण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## बाळासाहेब देसाई महाविद्यालयास नॅक चे 'ए प्लस' मानांकन



महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. २४ जुलै : कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयास बंगलोरच्या राष्ट्रीय स्तरावरील मुल्यांकन (नॅक) समितीकडून नुकतेच ए प्लस मानांकन मिळाले आहे. पाटणसारख्या ग्रामीण दुर्गम भागातील महाविद्यालयास मिळालेले हे यश महत्त्वाचे आहे या उत्तुंग यशाच्या पाठीमागे महाविद्यालयातील सर्व घटकांचे मोलाचे योगदान आहे. यापुढेही तालुक्यात शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे काम कोयना एज्युकेशन सोसायटी नक्की करेल, असा ठाम विश्वास कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयास राष्ट्रीय मुल्यांकन समितीकडून नुकतेच ए प्लस मानांकन मिळाले. याबद्दल माहिती देण्यासाठी संस्थेच्या सोसायटी कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांची उपस्थिती होती. संजीव चव्हाण पुढे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. त्याला तालुकास्तरावरच उच्च शिक्षण मिळावे या उद्देशानेच कोयना एज्युकेशन सोसायटीची निर्मिती करण्यात आली. प्रगती करत पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, सातारा मध्यवर्ती जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांचे खूप मोलाचे सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील निकालात सुधारणा, विद्यार्थ्यांना सोई सुविधा, नवनवीन कोर्सेस, पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिकदृष्टीने अभ्यास सुरू केले. यात बी.सी.ए., बी. कॉम. आयटी, पदव्युत्तर शिक्षणात मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र विषय सुरू केले. तसेच मुलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक असणारे ७२ करियर कोर्सेही सुरू केले आणि त्याचा विद्यार्थ्यांना चांगला फायदाही झाला. कोविड काळात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करत ऑनलाईन शिक्षण दिले. स्पर्धा परीक्षा, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू केल्याने त्याचाही फायदा विद्यार्थ्यांना झाला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांना स्वतंत्र व्यासपीठ मिळावे यासाठी महाविद्यालय कोट्यवधी रुपये खर्च करून अद्ययावत असे सभागृह बांधले. स्वच्छतागृह बांधले महाविद्यालयाने एन. एस. एस.च्यावतीने ग्रामीण भागातील ५ खेडी दत्तक घेऊन त्याठिकाणी आपत्कालीन प्रशिक्षण, प्रकल्प, शिबिरे, जनावरांसाठी लसीकरण आदीसह उपक्रम राबविले. तसेच महाविद्यालय परिसरातील झाड बोलतोय याउपक्रमा अंतर्गत प्रत्येक झाडाचा क्युआर कोड तयार करून वृक्षाची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली. या सर्वांचा परिपाक म्हणूनच महाविद्यालयातील सर्व घटकांच्या सहकार्यानेच महाविद्यालयाला मुल्यांकन समितीकडून ए प्लस ग्रेड मानांकन मिळाले आहे. यामुळे महाविद्यालयासह तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, सदस्य याज्ञसेन पाटणकर, डॉ. सुहास देशमुख, डॉ. प्रल्हाद चव्हाण, युवराज पाटणकर यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाने भविष्यात पुढील मानांकन मिळविण्यासाठी काही उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले असून यात तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी फायद्याचे ठरेल यासाठी हवामान विषयक, तंत्रज्ञान शिक्षण मिळण्यासाठी एम.सी.ए. व इतर विविध व्यावसायिक शिक्षण देणारे कोर्सेस सुरू करण्याचा मानस कोयना एज्युकेशन सोसायटीचा आहे. महाविद्यालयास मिळालेले हे यश तालुक्याच्या दृष्टीने निश्चित कौतुकास्पद व अभिमानास्पद असून पाटण तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर चमकले असल्याचेही संजीव चव्हाण यांनी शेवटी बोलताना सांगितले. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. पत्रकार परिषदेस नॅक समन्वयक डॉ. पी. वाय. फडणीस, सहसमन्वयक डॉ. एम. आर. सपकाळ, डॉ. एस. आर. सुपनेकर, डॉ. डी. आर. कहाते, डॉ. एस. एस. ताडाखे, डॉ. जी. एस. पठ्ठेबहादुर, डॉ. सी. एच. गही काटे, डॉ. डी. एस. पाटील, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. बी. बी. जाधव, प्रा. ए. टी. सुतार, प्रा. एम. डी. जाधव यांची उपस्थिती होती.